# मोटार वाहन विभाग, महाराष्ट्र शासन

## रिक्षा परवान्यांच्या वाटपासाठी जाहिरात - जानेवारी, २०१४

महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांचे कार्यक्षेत्रातील रिक्षा परवान्यांपैकी शासन निर्देशानुसार रिक्षा परवान्यांचे वाटपासाठी इच्छुक व पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

***ऑनलाईन अर्ज भरण्याचे वेळापत्रक**

१) ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दिनांक २७.०१.२०१४ सकाळी ११.०० ते दिनांक १५.०२.२०१४ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत उपलब्ध.
२) ऑनलाईन पेमेंट सुविधा दिनांक २७.०१.२०१४ पासून ते दिनांक १७.०२.२०१४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत उपलब्ध.

***ऑनलाईन अर्ज प्रक्रिया शुल्क रूपये १००/- (विनापरतावा)**

***वाटप करावयाच्या परवान्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | रिक्षा परवाने संख्या | अ.क्र. | कार्यालयाचे नांव | रिक्षा परवाने संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई (मध्य) | ० | २६ | धुळे | ७८३ |
| २ | मुंबई (पश्चिम) | १२०८० | २७ | जळगांव | १९४९ |
| ३ | मुंबई (पूर्व) | ८८५१ | २८ | नंदूरबार | ३०० |
| ४ | ठाणे | ३७४७ | २९ | औरंगाबाद | ६५० |
| ५ | कल्याण | ५०२६ | ३० | जालना | १३१४ |
| ६ | वाशी, नवी मुंबई | २६८७ | ३१ | बीड | १२३६ |
| ७ | वसई | १७५२ | ३२ | लातूर | ६८८ |
| ८ | पनवेल | ३२६२ | ३३ | उस्मानाबाद | ३०० |
| ९ | पेण (एमएमआरटीए क्षेत्र) | ८१५ | ३४ | आंबेजोगाई | ३३८ |
| १० | पेण (एमएमआरटीए क्षेत्र वगळून) | १०४१ | ३५ | नांदेड | २४९० |
| ११ | सिंधूदुर्ग | ९०३ | ३६ | परभणी | ८६६ |
| १२ | रत्नागिरी | ३४७८ | ३७ | हिंगोली | ३२४ |
| १३ | कोल्हापूर | ३०० | ३८ | अमरावती | ३०० |
| १४ | सांगली | १२६९ | ३९ | बुलढाण | ७८३ |
| १५ | सातारा | ३०० | ४० | यवतमाळ | ३०० |
| १६ | कराड | ८३ | ४१ | अकोला | ३६९ |
| १७ | पुणे | ८८७ | ४२ | वाशिम | ३०० |
| १८ | पिंपरी-चिंचवड | ६८५ | ४३ | नागूपर (शहर) | ५६० |
| १९ | बारामती | १२७ | ४४ | वर्धा | ३०० |
| २० | सोलापूर | १२६४ | ४५ | नागपूर (ग्रामिण) | ७३८ |
| २१ | अकलुज | १३२ | ४६ | गडचिरोली | ३०० |
| २२ | नाशिक | १६६७ | ४७ | चंद्रपूर | १२२२ |
| २३ | मालेगांव | ४८ | ४८ | गोंदिया | ३०० |
| २४ | अहमदनगर | १८९४ | ४९ | भंडारा | ३०० |
| २५ | श्रीरामपूर | | | | |
| | | | | एकूण | ६९३०९ |

**टिप :- उपरोक्त नमूद परवाना संख्येत बदल होऊ शकतो.**

**I. पात्रतेचे निकष**

१. अर्जदार भारतीय नागरिक असला पाहिजे.
२. वयोमर्यादा :- अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय २० वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.
३. शैक्षणिक अर्हता :- अर्जदार किमान १० वी इयत्ता उत्तीर्ण असावा. जर पुरेशा संख्येने, किमान १० वी इयत्ता उत्तीर्ण ऑटोरिक्षा बॅजधारक अर्जदारांकडून अर्ज प्राप्त झाले नाहीत तर किमान ८ वी इयत्ता उत्तीर्ण ही अट राहील.

## II. सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील –

१ अर्ज करण्याच्या दिनांकास अर्जदाराकडे ऑटोरिक्षा (परिवहन) Auto Rickshaw (Transport) ची वाहन चालक अनुज्ञप्ती तसेच सार्वजनिक सेवा वाहनाचा (ऑटोरिक्षा) बॅज असणे आवश्यक आहे.
२ अर्जदारास स्थानिक भाषेचे (मराठी) ज्ञान तसेच स्थानिक क्षेत्राचे भौगोलिक ज्ञान असणे आवश्यक आहे.
३ अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे सातत्याने वास्तव्य असले पाहिजे.
४ यशस्वी अर्जदारास, त्याच्या वास्तव्याच्या क्षेत्रातील संबंधीत पोलिस ठाण्याचे, अर्जदारावर किमान मागील एक वर्षात कोणताही दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे प्रमाणपत्र, सादर करावे लागेल.
५ यशस्वी अर्जदारास, तो/ती सरकारी/निमसरकारी, खाजगी कंपनी अथवा संघटित क्षेत्रातील कोणत्याही संस्थेत/ उद्योगात नोकरी करत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
६ यशस्वी अर्जदाराकडे, त्याच्या नावे ऑटोरिक्षा/टॅक्सीचा परवाना नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
७ अर्जदाराचा बॅज ज्या परिवहन कार्यालयामार्फत जारी करण्यात आला आहे. त्याच कार्यालयातील ऑटोरिक्षा परवान्यासाठी अर्जदारास अर्ज सादर करता येईल.

८ ज्या अर्जदाराकडे मुंबई (मध्य) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जारी करण्यैंत आलेली अनुज्ञप्ती व सार्वजनिक सेवा वाहनांचा ऑटोरिक्षा बॅज असेल तो अर्जदार प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) अथवा प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यापैकी कोणत्याही एकाच कार्यालयाकडे त्याच्या इच्छेनुसार अर्ज करू शकेल. ही सुविधा फक्त मुंबई (मध्य) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जारी करण्यात आलेली अनुज्ञप्ती व सार्वजनिक सेवा वाहनांचा ऑटोरिक्षा बॅज धारकांना लागू राहील.

## III. परवान्यांवर चालवावयाच्या ऑटोरिक्षांबाबत.

१ मुंबई शहरात परवान्यावर नोंद करावयाच्या ऑटोरिक्षा हया सी.एन.जी.अथवा एल.पी.जी. इंधनावर चालणाऱ्या असतील.

२ एल.पी.जी/सी.एन.जी भरणा केंद्र उपलब्ध असणाऱ्या इतर क्षेत्रात (उदा.पुणे, पिंपरी-चिंचवड) ऑटोरिक्षा याच इंधनावर चालणाऱ्या असतील. इतर क्षेत्रात त्या पेट्रोलवर चालणाऱ्या असतील.

३ परवान्यावरील ऑटोरिक्षांना मान्यता प्राप्त इलेक्ट्रोनिक मीटर असणे बंधनकारक आहे.

४ महानगरपालिका क्षेत्रात परवान्यावर नोंद होणारी ऑटोरिक्षा ही नवीन असली पाहिजे. महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर भागात परवान्यावर नोंद होणारी / चालवावयाची ऑटोरिक्षा ५ वर्षांपर्यंत जुनी चालेल.

५ भविष्यात परवान्यावर नोंद होणाऱ्या ऑटोरिक्षासाठी, शासन/परिवहन आयुक्त/संबंधीत प्राधिकरण हे जी.पी.एस./जी.पीआर.एस. आणि आर.एफ.आय.डी.टॅगचा वापर / जोडणी करणे परवाना धारकास बंधनकारक करू शकतील.

IV. कोणाही अर्जदारास एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत. असे आढळल्यास त्याचे सर्व अर्ज रद्द करण्यात येतील.

V. **अर्ज करण्याची पध्दत :-**

१. प्रस्तुत जाहिरातीद्वारे वितरित करावयाच्या रिक्षा परवान्यांच्या सोडतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज https://autopermit.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे, दिनांक २७ जानेवारी २०१४ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ या कालावधीत, सादर करणे आवश्यक राहील.

   २.१ पात्र अर्जदारांमधून लॉटरी पध्दतीने यशस्वी अर्जदाराची निवड केली जाईल. यासाठीची लॉटरी सोडत दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ किंवा अन्य दिवशी काढण्यात येईल.

   २.२ सोडतीचा निकाल २७ फेब्रुवारी २०१४ रोजी किंवा अन्य दिवशी परिवहन विभागाच्या तसेच महाऑनलाईनच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.

   २.३ यशस्वी अर्जदारानी, त्यांची आवश्यक कागदपत्रे, पडताळीसाठी, निकाल लागल्यानंतर संबंधीत प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांत दिनांक १५ मार्च २०१४ पर्यंत सादर करणे आवश्यक राहील संबंधीत परिवहन कार्यालयातून यशस्वी अर्जदारांनी सादर कलेल्या मूळ कागदपत्रांची छाननी करून रिक्षा परवान्यासाठीची इरादापत्रे वाटपाचे काम दिनांक ०१ मार्च २०१४ पासून केले जाईल

३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://autopermit.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

४. विहीत पध्दतीने ऑनलाईन अर्ज सादर करताना प्रक्रिया शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

५. प्रकिया शुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-

| | |
|---|---|
| १) नेट बँकिंग | २) डेबिट कार्ड |
| ३) क्रेडीट कार्ड | ४) संग्राम केंद्र /सीएससी (नागरीक सेवा केंद्र) |

६. www.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर संग्राम केंद्र (ग्रामपंचायती) आणि सीएससी सुची (यादी) उपलब्ध आहे.

७. अर्जदार मराठी किंवा इंग्रजीमध्ये अर्ज करू शकतो. त्यासंबंधीचे पर्याय screen वर उपलब्ध आहेत.

८. अर्जांमध्ये * अशी खूण असलेली माहिती भरणे अर्जदारास बंधनकारक (अनिवार्य) आहे.

९. अर्जदाराने त्याचा राहण्याचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह काळजीपूर्वक टाईप करावा / भरावा.

१०. संपर्क तपशिलामध्ये अचूक भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल फोन) देणे बंधनकारक आहे.

११. अर्जाच्या शेवटी दर्शवलेली प्रतिज्ञा वाचून **"मला मान्य आहे"** (I agree) समोरील चौकटीमध्ये क्लीक करावे.

१२. अर्ज भरल्यानंतर अर्ज पुन्हा तपासून घ्यावा. सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री झाल्यास "अर्ज दाखल करावा" (submit) या बटनावर क्लीक करावे.

१३. त्यानंतर प्रक्रिया शुल्क "Pay now" मध्ये क्लीक करावे.

VI. अर्ज स्विकारण्यासाठी महाऑनलाईन या संस्थेची परिवहन विभागाने नेमणूक केली आहे. इतर कोणाही व्यक्तीची / संस्थेची नेमणूक केलेली नाही. अर्जदारांनी कोणाही अनधिकृत व्यक्तीचे प्रलोभनास बळी पडू नये. तसे केल्यास परिवहन विभाग जबाबदार राहणार नाही.

VII. दिनांक १५.०२.२०१४ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेनंतर प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज सोडतीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

VIII. अर्जदाराने अर्जामध्ये विचारलेली माहिती मुद्दामहून चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील. तसेच अशा अर्जदारांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

IX. अधिक माहितीसाठी हेल्पलाईन नंबरवर ०२२ – ६१३१६४००, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी :- वेळ सकाळी ०९.३० ते रात्री ०९.३० व सुट्टीच्या दिवशी सकाळी ०९.३० ते संध्याकाळी ०६.३० संपर्क साधता येईल.

दिनांक :- २४.०१.२०१४
स्थळ :- मुंबई.

-सही-
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य